SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR-416004, MAHARASHTRA
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर–416004 महाराष्ट
PHONE: EPABX – 0091-0231-2609000 CoE Office: 0231-2609068
Website: www.unishivaji.ac.in
NAAC 'A' Grade
(2014)MHRD NIRF- 28th Rank

---

संदर्भ क्र: शिवाजी वि./ऑन परीक्षा/१६ दिनांक - २१/११/२०१९

प्रति,

१) अधिविभाग प्रमुख,
सर्व पदवी व पदवीत्तर अधिविभाग
शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर

२) प्राचार्य / संचालक,
सर्व संलग्नीत महाविद्यालय,
शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर.

३) संचालक, दूरशिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर.

विषय : परीक्षेच्या निकालातील त्रुटीसंदर्भात.

महोदय/महोदया,

विद्यापीठ परीक्षांचे निकाल वेळेत लावण्याच्या दृष्टीने अधिविभागातील/महाविद्यालयातील सर्व संबंधीताचे बहुमोल सहकार्य विद्यापीठास मिळत आहे. त्याबद्दल मी आपला आभारी आहे.

निकाल जाहीर झाल्यानंतर काही कारणास्वत त्रुटी असल्यास विद्यार्थ्याच्या गुणपत्रिकेवर "If any discrepancies found in the mark list, please submit an application in your respective College/University Department with all necessary documents immediately. College/Department should collect all such discrepancies and communicate to University within seven (7) days after declaration of result." असे नमुद करूनही विद्यार्थी परस्पर विद्यापीठाकडें अर्ज करत आहेत. तसेच एकच विद्यार्थी कमीत कमी ४ ते ५ वेळा विद्यापीठाकडे अर्ज करून अर्जाच्या अनूषंगाने कार्यवाही झाली आहे का ते सतत विचारत असतो. त्यामुळे विद्यापीठातील संबंधीत कर्मचा-यास विद्यार्थ्याच्या अर्जावरील कार्यवाही करण्यासाठी वेळ उपलब्ध होत नाही. त्यामुळे त्रुटींचे निराकरण जलद गतीने होत नाही. तसेच अधिविभाग/महाविद्यालये विद्यार्थ्यांना परस्पर विद्यापीठाकडे जाऊन चौकशी करण्याबाबत सूचना देत आहेत.

तरी आपणास उपरोक्त प्रमाणे असे पुन:श्च सुचित करण्यात येते की, निकाल जाहीर झाल्यानंतर निकालातील त्रुटीच्या अनुषंगाने विद्यार्थ्याचे त्रुटीचे प्रस्ताव/अर्ज एकत्र करून त्यासोबत योग्य ती कागदपत्रे असल्याची खात्री करूनच अधिविभाग प्रमुख/प्राचार्यामार्फत सर्व विद्यार्थ्याचे अर्ज पाठवण्याची कार्यवाही संबंधीत सेवकानी करावी. **तसेच यासंदर्भात विद्यार्थ्यानाही अवगत करावे**. विद्यार्थ्याचा कोणताही वैयक्तीक अर्ज विद्यापीठात स्वीकारला जाणार नाही याची नोंद घ्यावी. तसेच सदर विद्यार्थ्याच्या अर्जासंदर्भात पूर्तता झाल्याबाबतची चौकशी अधिविभाग/महाविद्यालयामार्फतच करावी. कोणत्याही परिस्थितीत विद्यार्थ्यांना विद्यापीठाकडे पाठवण्यात येऊ नये.

तसेच विविध अभ्यासक्रमांचे पासिंग बाबत एटीकेटी व दंडका संदर्भातील नियम हे विद्यार्थ्यांना आपल्या स्तरावर अवगत करून दयावेत ही विनंती.

सही /-

प्र- संचालक
परीक्षा व मुल्यमापन मंडळ.